ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *


| | | |
|---|---|---|
| 55 | शेतक-यांच्या आत्महत्या: काल, आज आणि उद्या<br>*Dr. V. T. Kokkar & Dr. K. B. Patole* | 198-201 |
| 56 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे भारतीय अर्थव्यवस्थेचे अपयश<br>*प्रा. विनायक जाधव* | 202-207 |
| 57 | शेतकरी आत्महत्येची कारणे<br>*डॉ. प्रसन्नजीत रामकृष्ण गवई* | 208-209 |
| 58 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा चिकित्सक अभ्यास<br>*डॉ.एस.टी.सामाले* | 210-212 |
| 59 | शेतकरी आत्महत्या कारणे व उपाय<br>*डॉ. तायनाथ व्ही. पी* | 213-217 |
| 60 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे व उपाय योजना<br>*प्रा.जयश्री जयतीर्थ स्वामी* | 218-219 |
| 61 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या: एक समाजशास्त्रीय अभ्यास<br>*अन्सारी एस. जी.* | 220-222 |
| 62 | शेतकऱ्यांच्या आत्महत्यारोखण्यासाठी उपाययोजना<br>*Dr. B. K. Shinde & Dr. K. B. Patole* | 223-225 |
| 63 | अस्वस्थ बळीराजाचं प्रतिबिंब: शेतकरी आत्महत्या<br>*डॉ.राजाराम केरबा पाटील* | 226-228 |
| 64 | यवतमाळ जिल्हा शेतकरी आत्महत्या कारणे<br>*प्रा.एस.पी.बडवाईक* | 229-231 |
| 65 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे समाजशास्त्रीय विश्लेषण<br>*प्रा.डॉ. भगवान डोंगरे* | 232-235 |
| 66 | मराठी कादंबरीतील शेतकरी जीवनदर्शन : एक दृष्टिक्षेप<br>*प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले* | 236-238 |
| 67 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक अभ्यास<br>*प्रा.डॉ.अमित रामलींग कवठाळे* | 239-240 |
| 68 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक दृष्टिक्षेप<br>*जितेंद्र पांडूरंगराव काळे* | 241-242 |
| 69 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या<br>*डॉ. कागदे बी. बी.* | 243-244 |


**Dr. Anil Chidrawar**
**I/C Principal**
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR

६६.

# मराठी कादंबरीतील शेतकरी जीवनदर्शन : एक दृष्टिक्षेप

**प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले**
*प्रमुख, मराठी विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड*

साहित्य हे समाजाचा व पर्यायाने मानवी जीवनाचा आविष्कार घडविण्याचे साधन आहे. या साहित्यामधून मानवी जीवन चित्रण घडविताना सहजताच येथील शेतकऱ्याचे जीवन दर्शन घडतेच. भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेती हाच येथील राज्यव्यवस्थेचा कणा आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्य समाजाभिमुख झाले, परिणामत:मराठी साहित्यात सामान्य माणसांच्या जगण्याचे पडसाद उमटू लागले. शेतकरी- कष्टकरी- गरीब- दीन-दलित यांचे जीवनचित्रण हा साहित्याचा अविभाज्य भाग बनला. खेडयातून आलेल्या नवशिक्षित लेखकांनी मराठी भाषेतून साहित्य निर्मिती करीत असताना सभोवतीच्या वास्तावाला साहित्यरूप दिले. त्यामधून शेतकरी व शेतीशी संबंधित जीवनदर्शन करण्यात येऊ लागले. साठोत्तरी मराठी वाङ्मयीन प्रवाहातील साहित्यिकांनी साहित्य निर्मितीमधील साचलेपणा दूर करून ते लोकाभिमुख करताना ग्रामीण- दलित जीवनचित्रणाला स्थान दिले. खेडे आणि खेडयातील शेती करणारा शेतीवर आधारित जीवन जगणारा माणूस साहित्याचा केंद्रबिंदू बनला. सराई, पाणकळा, बनगरवाडी ते आजपर्यंत कित्येक साहित्यकृतीच केंद्रबिंदू शेती अथवा शेतीशी निगडित राहिलेला आहे. 'पाचोळा , कालचक्र, गांधारी, आई आहे शेतात, गणगोत चारापाणी, सावट, असं जगणं तोलाचं , धूळपेरणी, गावठाण, रौंदळा, वनवास, सुपारीचे सेवक, ऐसे कुणबी भूपाळ, गावपांढरी, गाडा' इ. असंख्य कादंबऱ्यामधून कृषक समाजाचे जीवनचित्रण आले आहे. त्यामध्ये शेती- माती- नाती - गोती यांचे वैविध्यपूर्ण व भावस्पर्शी दर्शन घडविताना त्यांच्या जीवनातील सुख दुःख, निरनिराळे प्रसंगाचे चित्रण आलेले आढळते. १ मे १९६० ला भारतात स्वतंत्र महाराष्ट्र या राज्याची निर्मिती झाली. आजपर्यंत १४ मुख्यमंत्री महाराष्ट्राने पाहिले. महाराष्ट्राची प्रदेशवार विभागणी कोकण - भाताचा प्रदेश, पश्चिम महाराष्ट्र- ऊसाचा प्रदेश, विदर्भ- कापसाचा प्रदेश, मराठवाडा-संताचा प्रदेश तर मुंबई श्रीमंताचा प्रदेश आहे. महाराष्ट्राने राष्ट्रीय पातळीवर अनेक नेतृत्व देशाला प्रदान केले. भारतीय राजकारण आणि अर्थकारणात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा राहिला आहे. महाराष्ट्र एक पुरोगामी विचाराचे राज्य आहे. महाराष्ट्र ही संताची व समाजसुधारकांची भूमी आहे. फुले, शाहू,आंबेडकर इ.समाजसुधारकांनी समाजातील प्रश्नांची मांडणी व त्यांच्या सोडवणूकीच्या अनुषंगाने अनेक प्रयत्न केले.

विषमता, दारिद्रय, गरीबी, बेरोजगारी,दहशतवाद, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, एड्स,भ्रष्टाचार, बलात्कार, हुंडाबळी, निकृष्ट राहणीमान, शेतकऱ्यांची आत्महत्या इ. कितीतरी समस्या आहेत. ज्याची यादी हनुमानाच्या शेपटीसारखी लांबत जाईल. या सर्वात शेतकऱ्यांची आत्महत्या हा महत्वाचा प्रश्न आज बनला आहे. आत्महत्या म्हणजे रिचीच्या मते ज्या लोकांना आपले जीवन भारस्वरुप वाटते त्यांच्यात समाजसेवेची क्षमता असते. परंतु अविचारीपणे जीवन संपविणे म्हणजे आत्महत्या होय.भारतात हरितक्रांती झाल्यानंतरसुद्धा ही शेतकरी आत्महत्या होतात. शेती व्यवसायासाठी विपुल प्रमाणात कर्जाचा पुरवठा करणे, सावकारशाही बंद करण्याचा कायदा पास करणे, शेतकऱ्यांचे विज बील माफ करणे, वेळोवेळी आर्थिक पॅकेज जाहीर करणे,नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांच्या नाम संस्थेच्या माध्यमातुन आत्महत्याग्रस्त कुटूंबियास मदत देणे व शासनामार्फत दुष्काळ काळात आर्थिक मदत करणे इ. प्रयत्न असूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. याचे **'बारोमास'**याकादंबरीतून सदानंद देशमुखांनी दर्शन घडविले आहे. बारा महिने नेहमीच संकटाचा सामना करीत दुःखाना उराशी कवटाळत जीवन जगणाऱ्या शेतकऱ्याची वेदना याकादंबरीतून मुखर केली आहे. आपल्याकडील कृषी क्षेत्राविषयी असणाऱ्या व्यवस्थेची यात मूलभूत चूक आहे. 'ज्याच जळत त्यालाच कळत' या म्हणीप्रमाणे शेतकरी कसा जगतो, कसा पिकवतो, त्यासाठी त्याचे काय हाल होतात, निसर्गाचा प्रकोप, उन्हाचा त्रास, उपासमार इ.ची त्यांना जाण व खंत नाही. थोडक्यात स्वातंत्र्यात परकेपणाची भावना आमच्या प्रतिनिधीकडून दाखवली जाते. सवतीसारखी वागणूक स्वातंत्र्यात सर्व सामान्यांना (शेतकऱ्यांना) दिली जाते. यासंबंधीचा मागोवा **'वनवास'**याकादंबरीत आनंद कदम यांनी घेतला आहे. प्रस्तुत कादंबरी संगत प्रकाशन नांदेड कडून २६ जानेवारी २००८ रोजी प्रकाशित झालेली असून पृष्ठ संख्या ३३६ व १८ प्रकरणात विभागलेलीआहे . याकादंबरीचा निवेदक 'आनंदा' असून प्रथमपुरूषी कथन पध्दतीचा अवलंब करुन सर्व घटनांचा तो साक्षीदार आहे. याकादंबरीमध्ये लेखकाने शेतकरी जीवनदर्शन घडविताना बदलत्या ग्रामवास्तवाचा वेध घेतला आहे . शेतकऱ्याचे दैन्य दिवसेंदिवस वाढत आहे. तरीही शेतकरी शेती करणे सोडून देत नाहीत.मग त्यास निष्काम कर्मयोग म्हणावे की भोळी-भाबडी पूजा समजावी ? याबद्दलचे विवेचन करताना लेखक नांदेड जिल्हयातील

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

हदगाव- हिहमायतनगरच्या परिसरातील वास्तव्य करणाऱ्या कृषक समाजाचे प्रातिनिधिक वर्णन केले आहे. 'पिकेल ते विक[illegible] खात्री नसताना निसर्गाच्या लहरीपणामुळे कास्तकराला सदासर्वदा दुष्काळाच्या सावटाखाली जीवन जगावे लागते. वर्षभर राबराबून [illegible] पोटाला पोटभर अन्न मिळत नाही. शेतमाल कधी पदरात पडलाच तर मातीमोल विकावा लागतो. यासंबधीचे संवादातील संदर्भ कादंबरीत सापडतात. गोविंद आज्या आनंदाशी बोलताना झालेला संवाद खालीलप्रमाणे-

'काय मन्नार शेती बाडी आनंदा, चांगली हाय सध्यातरी . कालच हास्ताच पोटभर पाणी झालं.'

'म्हणजे ?'

'मंजे आसं की, आतापसोर तरी पीक हिरवंगार दिसते. पनीक शेतकऱ्याच्या घरात पडून ते बाजारात जाऊन त्याला चांगला भाव लागेस्तोर काही खर नसतं..'

'नाही तर ? नाही तर काय व्हईल ?'

'आरे बापू ! काय व्हईल अजून काय इच्यारतूस ? आता फाय हे पाणी आसंच चालू राहायलं तर जेवारीच्या दाटाच्या मुळया ढिल्या करतील आन् मंग नाट सुटू न ते खाली पडतील, भरलेल्या कणसास मोड येईल. ज्वारी काळीडक्कं होईल, हुरडा असलं तर मीजमाशी पडलं, जेवारीची ही गत तर कापसाचं तसचं व्हईल वाऱ्यानं पीक हलूहलू जमिनीत दर पडतील, कापसाची एकच मुळी असते, मंग ती ढीली झाली की सगळा कापूस उंबळून जाईल.' ... वरील संवाद बराच विस्ताराने नोंदविवला असून त्याद्वारे नैसर्गिक आपत्तीमुळे शेती व शेतकरी यांचे होणारे अपरिमित हानी दर्शविली आहे. शेतकऱ्याच्या दारिद्रयाचे फेरे कधीच चुकत नाहीत. निसर्गाचा प्रकोप त्याची पाठ सोडत नाही. याबाबतचा मागोवा समकालीन शेतकऱ्याचे वास्तवदर्शी चित्रण करणारा आहे. शेतकऱ्याने बारा महिने शेतात राबून, रक्ताचा थेंबन् थेंब आटवून पिकविलेल्या मालाला बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही , दारिद्रय उपासमार पाठ सोडत नाही, म्हणून सांघिक लढे उभारले जातात. व्यापाऱ्याविरूद्‌ध संघर्ष केला जातो. शासकीय धोरणांचा निषेध करण्यासाठी आंदोलने केली जातात. अशा सांघिक लढयाचे नेतृत्व 'बापू' यापात्राकडून कादंबरीत केले आहे. वीज पडून शेतकरी दगावणे, वीज पुरवठा नियमित नसणे, शेतमालाला भाव नसणेया विरूद्‌ध लढा देण्याचे संदर्भ (पृ. ३२४)आले आहेत.

कादंबरीच्या उत्तरार्धात एम.एस. ई. बी. च्या लोडशेडिंगचे शेतकऱ्यांच्या दिनचर्येवर विपरित परिणाम कसे होतात? शेतकऱ्यांच्या नाकात दम कसा आणला जातो? दिलेल्या भारनियमनाशिवाय केव्हाही वीज गुल होते आणि पिकांना पाणी वेळीच मिळत नसल्यामुळे हाती येण्यासाठी बागायती पीके कोलमडते. वीजपुरवठा महानगरात कारखान्यात नियमितपणे केला जातो. सुगीच्या काळात किटकैट काढून शेतकऱ्यांचा वीजपुरवठा खंडीत करुन अडचणीत आणली जाते. तेव्हा गाव व परिसरातील शेतकरी थोडासा बापूंना आजार असल्यामुळे अंगातील कणकण असलेल्या बाजूंना वीजकार्यालयावर मोर्चा घेऊन जायला भाग पाडतात. कार्यालयाकडे जाताजाता एका वीजेच्या डिपोजवळ ते गाडी थांबवायला सांगतात. व तेथेच आपल्या सोबतच्या शेतकऱ्यांना तो डिपो पाहून म्हणतात, 'पहा सरकारी कारभार किती भोंगळ असते पहा! हे डेपो म्हणाव की मृत्यूचा सापळा? अरे कोणी शेतकरी येईल, ढोरके येतील, येणारा-जाणारा वाटसरु येईल आणि हे किटकॅट असे टाकून सरळ वरच....''आ SS आ SS' ,असे बोलत असताना कोणाला कळण्याच्या पूर्वीच एकदम वीजेचा शॉक लागून बापू खूप दूर फेकले गेले? गतप्राण झाले. अशा शेतकरी संघटनेत काम करणाऱ्या बापूचा करुन अंत झाला. त्यांची अंत्ययात्रा कादंबरीच्या शेवटच्या प्रकरणात (पृ. ३३७) आलेली आहे.

एकंदरीत जागतिकीकरणे मानवी जीवन गतिमान झाले. परंतु अपघाताने माणसांचे जगणे नष्ट होत आहे. कृषिकर्म करणाऱ्या माणसाच्या जगण्यावर सातत्याने दुःखाचे डोंगर उभे राहत आहेत. शेतीव्यवस्था सुधारण्याचे केवळ पोकळ देखावे निर्माण झालेले आहेत. कष्टकऱ्यांच्या जगण्याला शेतीव्यवहाराला जागतिकीकरणाचा भिरुड लागला आहे. कीड लागून लाकडातून जसे पीठ गळते तसेच शेतकऱ्यांचे दुःखाश्रू सतत गळत आहेत. ते कायम स्वरुपी थांबविण्याची क्षमता जागतिकीकरणात नाही, असे या कादंबरीमध्ये लेखकाने कल्पित व वास्तव भावविश्व उभे केले. त्यामधून अनुभवास येते. ज्वलंत ध्येयवाद की स्वच्छेने स्वीकारलेला कर्मदरिद्रीपणा, हतबलता, उदासीन भोंगळपणा यांचे प्रत्यंत्तर या कादंबरीत घडते. प्रातिनिधिक संघर्ष आज आपल्या देशात सर्वत्र घडत आहे. केवळ एखाद्या साहित्यकृती पुरता तो मर्यादित नाही. सद्यःस्थितीत स्वयंपूर्ण खेडे ही संकल्पना मोडीत निघाली. मागच्या वीस-पंचवीस वर्षात शेतीच्या उत्पादनावरील खर्च हळूहळू वाढू लागला. परंतु उत्पन्न मात्र त्या प्रमाणात नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची बनत आहे. दिसण्यापुरते उत्पन्न भरपूर होऊन सुध्दा खर्चाचा हिशोब बराच असल्याने हातातील पैसा त्यामध्येच होत आहे. त्याचे विपरित परिणाम घराघरामध्ये घडू लागले. कौटुंबिक खर्चामुळे संघर्ष घडू लागले. त्यानुसार यांत्रिकता-आधुनिकतेच्या प्रभावातून कोलमडणाऱ्या ग्रामीण शेतकऱ्याचे चित्रण 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीत लेखक भारत काळे यांनी घडविले. खेडयातील बदलते समाजवास्तव, कुटुंबवास्तव आणि परंपरागत स्थिती यांचा तुलनात्मक वेध घेत असताना विश्वनाथ-काशीनाथ या प्रातिनिधिक भावाच्या वतनदान-जमीनदार कुटुंबाची दुःखद कहानी लेखक कादंबरीतून कथन करतात. या कहानीमध्ये विश्वनाथ -काशीनाथ यांच्या कुटुंबाची संयुक्तता, एकसंघता हा परंपरागत खेडयातील वैभवाची ओळख असताना काळानुरुप सख्याभावामध्ये संघर्षाची ठीणगी शेतीतील उत्पन्न-खर्च यांचा

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

ताळमेळ न जुळल्यामुळेच पडते. तसेच विश्वनाथ-काशीनाथ यांच्या बहिणींच्या म्हणजे मेहुण्यांच्या घरातील कौटुंबिक संघर्ष-[illegible] कळीचा मुद्दा घेऊन लेखक उभा करतात. गॅट करारामुळे जग परस्परांशी जोडले गेले. जागतिक पातळीवरील परिणाम खेड्यावर खेडयातील माणसांवार होऊ लागले. परंतु खेडयातीलन माणूस जो भारतीय संस्कृतीला प्रमाण मानून जगणारा होता, तो स्वार्थी [illegible] गेला किसनसारख्या खेडयातील ढोंगी प्रवृतीच्या माणसामुळे संयुक्त कुटुंबव्यवस्थेला तडे गेले. कामचुकारपण दवाखान्याचे निमित्त शोधून काम बुडविणे तथा पैशाची उधळपट्टी करुन घर दिवाळखोरीला आणण्याच्या अशा बऱ्याच वामप्रवृत्ती खेडयात घुसल्या. सद्यःस्थितीत भाऊबंदकीतील जिव्हाळा,प्रेम आपुलकी कमी होऊन परस्पर वैमनस्य मोठ्या प्रमाणात वाढत आहे. कोणत्याही वडिलोपार्जित शेती, घर, धंदा अथवा जित्राब यांच्या निमित्ताने भावकीतील वाद विकोपाला जातात. त्यामुळे परस्परांतील बदलत्या अपप्रवृत्ती हे महाराष्ट्रीयन समाजातील जागतिकीकरणाची देणगीच आहे. असे प्रस्तुत कादंबरीच्या अध्ययनानंतर मला वाटते.'रानात कुंदा माजला तरी चालेल पण धुऱ्यासाठी भांडण होणार.' आम्ही शेटासाठी लौडा जाळणारी माणसं हाऊत. मग सगळी राख लागली तर हरकत नाही पण धुरा न गेला पाहिजे.' कळवंडीला अंत नाही. अस्तित्त्वासाठीच्या संघर्ष घरातल्या घरात कोण मोठा? गावातल्या खेकडा-माकडानं काठया घातल्या. तरी ते सहन करतील, प्रसंगी ढुंगणाला पाय लावून पळतील . पण भावानं डोळं उचलून जरी बघितलं तरी काठी हातात घेतील.' (पृ४८३) अशा खेडयातील भावाभावामधील-भावकीमधील घुसलेल्या वामप्रवृत्ती ही आधुनिक काळात जास्तच विकोपाला जात आहे. प्रसारमाध्यमामुळे भावकीचे संघर्ष गडदपणे सामान्य खेडवळ माणसापर्यत पोचविले जातात. त्याची परिणिती सामान्य खेडवळ माणसाच्या परस्परांमध्ये ते तुटलेपणा येत आहे. त्याचे दर्शन घडते. म्हणून जागतिकीकरणाच्या प्रभावळीतून आज एकही माणूस सुटलेला नाही. सामाजिक स्वास्थ्य व शेतीव्यवहार बिघडण्यासाठी महत्त्वाची भूमिका जागतिकीकरणाने निभावली आहे. म्हणून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे खेडयातील माणसांचे दु:ख, दैन्य, बेकारी वाढविण्यास जागतिकीकरण पुरक ठरले आहे, असे मला वाटते. 'असं जगणं तोलाचं व धूळ पेरणी' या कादंबरीतून शेषराव मोहिते यांनी कृषक समाजातील बदलत्या जाणिवांचा वेध घेतला आहे. विहिरीवरील इंजिन शेतातील कामे करण्यासाठी ट्रक्टर तथा बोअरवेलची गाडी यांचा वापर केला जातो. या यांत्रिकीकरणामधून आधुनिक पध्दतीने शेतीची कामे करण्यासाठी कृषी पदवी (बी.एस्सी. ॲग्री) झालेला श्रीराम नवीन प्रयोग शेतीमध्ये करतो. परंतु शेती कधीच फायद्याची ठरत नाही. शेतकऱ्याले अठराविश्व दारिद्रय संपत नाही. उलट निसर्गाच्या लहरीपणामुळे वाढत्या उत्पादन खर्चात शेती परवडत नाही श्रीराम शेतीमध्ये आधुनिक प्रयोग करुन सुध्दा शेतीमध्ये नफा मिळत नाही. हा सद्यःस्थितीत शेतकऱ्यामधील वैचारिक संघर्षाला स्थानीय स्वरुप लाभते. कौटुंबिक पातळीवरील संघर्षाचे निमित्त ठरते. 'गावपांढरी, गाडा, रौदंळा, गावठाण, धूळमाती ' या कादंबरीमधून शेतकरी जीवनदर्शनच घडते. अशा प्रकारे ग्रामीण कादंबरी आणि कृषक समाज यांचा मागोवा घेत असताना प्रातिनिधिक कादंबऱ्याचे संदर्भ नोंदविले आहेत. प्रातिनिधिक संदर्भामधून मराठी साहित्यामध्ये जे कृषक समाजाचे दर्शन घडते. त्याद्वारे खेडयातील जगण्यावर जागतिकिकरणाचा प्रभाव कसा पडत आहे? खेडयातील माणूस हल्ली कसा बदलला आहे. बदलत आहे? यांचे दर्शन घडते. वरील विवेचनामधून काही निष्कर्ष नोंदविता येतात. ते पुढीलप्रमाणे-

१. जागतिकिकरणाच्या प्रभावातून महाराष्ट्रीयन शेतकरी आणि शेती यांच्यात अंतर्बाहय बदल झालेला आहेच. २. कृषक समाजदर्शन घडविणाऱ्या मराठी साहित्यामधून जागतिकिकरणामुळे खेडयामध्ये निर्माण झालेली आगतिकता प्रत्ययास येते.३. मराठी ग्रामीण कादंबरीमधून आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, औद्योगीकरण यांच्या प्रभावातून बदललेल्या ग्रामवास्तवाचा वेध घेतला आहेच. ४. खेडयामध्ये आधुनिक काळात बऱ्याच सोयी निर्माण झालेल्या आहेत, असे दिसत असले तरी बऱ्याच खेडवळ माणसांचे जगणे उध्वस्त होत आहे. ५. माणसामधील दुरावा तुटलेपणा हा पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव कादंबरीतून अधोरेखित केला आहे.. ६. खेडयातील नवीन घटकांचे ग्रामीण माणसांना आत्महत्येसारख्या अतिशय भयंकर संकटामध्ये ढकलण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात. याकडे अभ्यासकांचे लक्ष वेधण्यासाठी प्रस्तुत साहित्यामधून घडणारे शेतकरी जीवनदर्शन उपयुक्त ठरते. ७. कल्पकता आणि वास्तवता यांचा एक अजोड सांधा या कादंबऱ्यामध्ये सापडतो. अलिकडे कादंबरीतील जीवनदर्शन वास्तवतेकडे झुकत आहे, असे मला वाटते.

**संदर्भग्रंथ**

*आवटे गणेश:गणगोत,( साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वित्तीयावृत्ती, २०१० चे हस्तलिखित)*
*कदम आनंद : वनवास, (संगत प्रकाशन, प्रथमावृत्ती -२००८)*
*गणोरकर प्रभा व इतर (संपा.):वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, (भटकळ फाउंडेशन,मुंबई,प्रथमावृत्ती २००१)*
*ठाकूर रवींद्र : मराठी ग्रामीण कादंबरी, (स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे, द्वितीयावृत्ती- २००१)*
*नलगे चंद्रकुमार (संपा): ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, (सुरेश एजन्सीज, पुणे, प्रथमावृत्ती -१९८५)*
*बिरादार बाबू: संभूती, (देशमुख आणि कंपनी, पुणे , प्रथमावृत्ती - २००४)*
*बोराडे रा.रं.: पाचोळा, (मौज प्रकाशन गृह, मुंबई, आवृत्ती सातवी,२००३)*
*वाघचौरे भीमराव : पानघळी पाणघळी, (साकेत प्रकाशन औरंगाबाद,१९९८)*
*काळे भारत : ऐसे कुणबी भूपाळ, (देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती २००१)*



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded